महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई ४०० ०१९
email : cgmpmahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.२८३/ 3827 दिनांक : 12 FEB 2021

**प्रति,**
**मुख्य अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं.मर्या.**
**परिमंडल कार्यालय (सर्व).**

**विषय:** दुर्गम / आदिवासी क्षेत्रात काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत..

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, क्षेत्रिय कार्यालयांकडून दुर्गम / आदिवासी क्षेत्रात काम करीत असलेल्या आणि एकस्तर पदोन्नतीचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबतचा मुद्दा उपस्थिती करण्यात आला होता.

२. याबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा दि. ०६.०८.२००२ अन्वये नक्षलग्रस्त भागातील कर्मचाऱ्यांकरीता विविध सवलतींचे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आले असून, सदर शासन निर्णयास अनुसरून प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७८ दि. २९.०१.२००३ अन्वये सदरच्या सूचना कंपनीअंतर्गत लागू करण्यात आलेल्या आहेत. शासनाने विहित केल्यानुसार उच्च वेतनश्रेणी लाभाबाबत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

" आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून वेतनगट १ ते ४ मधील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यास त्या क्षेत्रात असेपर्यंतच्या काळात त्याने धारण केलेल्या मूळ पदाच्या नजिकच्या / पदोन्नतीची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतन निश्चीतीचा लाभ देण्यात यावा. ज्या कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा [सा.आ. ७४. (क)/ सा.आ. १११(क)] लाभ दिलेला आहे. त्यांना आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल ही एकस्तर पदोन्नतीची योजना दि. ०१.०७.२००२ पासून अंमलात येईल आणि ती संबंधीत कर्मचारी आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असे पर्यंतच अनुज्ञेय राहील. त्या क्षेत्रातून कर्मचारी बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर तो त्याच्या मूळच्या संवर्गाच्या वेतनश्रेणीत पूर्वीच्या वेतनाच्या अनुषंगाने वेतन घेईल.

३. वरील तरतूद विचारात घेता ज्या कर्मचाऱ्यांना आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असतांना म्हणजेच ते एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ घेत आहेत अशा कालावधीमध्ये उच्च वेतनश्रेणीचा लाभ देय होत असल्यास सदरचा लाभ मंजूर करण्यात यावा व याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. तथापि सदर कर्मचारी वरच्या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेत असल्याने उच्च वेतनश्रेणी लाभाचे प्रत्यक्ष प्रदान करण्यात येणार नाही. तदनंतर, सदर कर्मचारी बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर सदर क्षेत्रामध्ये रूजू झाल्याच्या दिनांकापासून उच्च वेतनश्रेणीच्या लाभाचे प्रत्यक्ष प्रदान करण्यात येईल. अशा प्रकरणी उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करीत असतांना 'एकस्तर' वेतनश्रेणीनुसार संबंधीत कर्मचाऱ्याचे वेतन संरक्षित (Pay Protect) करण्यात येणार नाही

४. सबब, उच्च वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करीत असतांना उपरोक्त तरतुदी विचारात घेउन संगणकीय प्रणालीव्दारेच सदर लाभ मंजूर करण्यात यावेत.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**<u>प्रत सविनय सादर :</u>**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, कल्याण / औरंगाबाद.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे / नागपूर.

**<u>प्रत रवाना :</u>**

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.